
8 SEP 2023 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवरायांचे कार्यकर्तृत्व प्रेरक : डॉ. यासुकाता

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर अखिल भारताचे आराध्यदैवत आहेत. त्यांचे कार्यकर्तृत्व पिढ्यान्‌पिढ्यांना प्रेरणादायी आहे. त्यामुळे त्यांच्या नावे असलेल्या विद्यापीठात प्रथमच येत असताना होणारा आनंद अवर्णनीय आहे, अशी भावना मुंबईतील जपानचे कॉन्सूल जनरल डॉ. फुकाहोरी यासुकाता यांनी आज येथे व्यक्त केली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी जपानचे मुंबईतील कॉन्सूल जनरल डॉ. फुकाहोरी यासुकाता यांचे शिवचरित्र ग्रंथ भेट देऊन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी स्वागत केले. यावेळी शेजारी डावीकडून डॉ. एस. बी. सादळे, हामुरी मेगुमी, प्रमोद पाटील, विलास शिंदे उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठात सुरू होत असलेल्या इंडो-जपान आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेच्या पूर्वसंध्येला डॉ. यासुकाता यांचे आगमन झाले. त्यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, जपानी वकिलातीच्या संस्कृती व माहिती विभागाच्या कॉन्सूल हामुरो मेगुमी उपस्थित होत्या.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परिषद समन्वयक डॉ. एस. बी. सादळे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे उपस्थित होते.

**'भव्य पुतळा पाहून प्रभावित'**

मी महाराष्ट्रासह दिल्ली येथेही वास्तव्य केले आहे. तेथेही छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी प्रचंड आदर दिसून येतो. महाराष्ट्रभूमी तर आजही त्यांची ऋणी आहे. त्यामुळे येथे विविध स्मारक, वास्तूंना त्यांचे नाव दिल्याचे दिसते. शिवाजी विद्यापीठासारखी शैक्षणिक संस्थाही महाराजांच्या नावे उभी आहे, याचाही अभिमान वाटतो. महाराजांचा विद्यापीठाच्या प्रांगणातील भव्य पुतळा पाहून प्रचंड प्रभावित झाल्याचे डॉ. यासुकाता यांनी सांगितले.

- 8 SEP 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवरायांचे कार्यकर्तृत्व पिढ्यान् पिढ्या प्रेरक

## डॉ. फुकाहारी यासुकाता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची घेतली सदिच्छा भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर अखिल भारताचे आराध्य दैवत आहे. त्यांचे कार्यकर्तृत्व पिढ्यान् पिढ्यांना प्रेरणादायी आहे. त्यामुळे त्यांच्या नावे असलेल्या विद्यापीठात प्रथमच येत असताना होणारा आनंद अवर्णनीय आहे, अशी भावना मुंबईतील जपानचे कॉन्सूल जनरल डॉ. फुकाहारी यासुकाता यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात सुरू होत असलेल्या इंडो-जपान आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेच्या पूर्वसंध्येला डॉ. यासुकाता यांचे विद्यापीठात आगमन झाले. त्यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. यासुकाता यांच्यासमवेत जपानी वकिलातीच्या संस्कृती व माहिती विभागाच्या कॉन्सूल हामुरो मेगुमी उपस्थित होत्या.



डॉ. यासुकाता म्हणाले, मी महाराष्ट्रासह दिल्ली येथेही वास्तव्य केले आहे. तेथेही छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी प्रचंड आदर दिसून येतो. महाराष्ट्र भूमी तर आजही त्यांची ऋणी आहे. त्यामुळे येथे विविध स्मारकांना व वास्तूंना त्यांचे नाव दिल्याचे दिसते. शिवाजी विद्यापीठासारखी शैक्षणिक संस्थाही महाराजांच्या नावे उभी आहे, याचाही अभिमान वाटतो. महाराजांचा विद्यापीठाच्या प्रांगणातील भव्य पुतळा पाहून प्रचंड प्रभावित झाल्याचे त्यांनी सांगितले.

भारत आणि जपान या दोन्ही राष्ट्रांमध्ये अनेक प्रकारची साम्य स्थळे असल्याचे सांगून डॉ. यासुकाता म्हणाले, दोन्ही देशांमध्ये प्राचीन काळापासून विविध प्रकारचे सहसंबंध राहिले आहेत. दोन्ही शांतिप्रिय देश असून, मानवतेच्या उदात्त कल्याणासाठी झटणारे आहेत. मानवतेचा विचार येथे सर्वोच्च स्थानी आहे. दोन्ही देशांना परस्परांच्या संस्कृतीविषयी जाणून घेण्याची ओढ आहे. त्यामुळेच या देशांत भाषिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक तसेच तंत्रज्ञानात्मक बंध सातत्याने अधिकाधिक विकसित होत असल्याचे दिसते.

यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागात जपानी भाषा शिकण्याकडे कोल्हापूर परिसरातील विद्यार्थी, उद्योजक व व्यावसायिकांचा कल वाढत असल्याचे सांगितले. जपानमधील विविध विद्यापीठांशी शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार असून, अनेक शिक्षक, विद्यार्थी तेथील विद्यापीठांमध्ये शिकत वा शिकवत असल्याचेही त्यांनी सांगितले. स्वतः प्र-कुलगुरू डॉ. पाटील आणि डॉ. सादळे हे जपानी विद्यापीठांशी शैक्षणिक संबंध राखून असल्याचेही त्यांनी सांगितले. भविष्यात शिवाजी विद्यापीठाचे जपानशी असणारे बंध अधिक वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी कॉन्सूल जनरल डॉ. यासुकाता यांना डॉ. बाळकृष्ण लिखित 'शिवाजी दि ग्रेट' हा ग्रंथ भेट देऊन स्वागत केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परिषद समन्वयक डॉ. एस. बी. सादळे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे उपस्थित होते.

सकाळ

# जपानला भारताची अधिक गरज

## संशोधक प्रा. योशिरो अझुमा : विद्यापीठात व्याख्यान

▸ सकाळ वृत्तसेवा



प्रा. योशिरो अझुमा

कोल्हापूर, ता. ७ : जपान आणि भारत यांची सद्यस्थिती बरीचशी परस्परपूरक आहे. त्यांच्यामध्ये संधींचे अवकाश व्यापक आहे. मनुष्यबळाबाबतीत जपान तोकडा पडतो. भारत मात्र मनुष्यबळाच्या बाबतीत समृद्ध आहे. येथील शिक्षण, संशोधन, सुविधांचा दर्जाही वाढत आहे. त्यामुळे भारताला जपानची जितकी गरज आहे, त्याहूनही अधिक जपानला भारताची गरज आहे, असे प्रतिपादन जपानच्या टोक्यो येथील सोफिया विद्यापीठाचे वरिष्ठ संशोधक प्रा. योशिरो अझुमा यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित १३ व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हअंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेच्या पूर्वसंध्येला प्रा. अझुमा यांचे 'जपान आणि भारतामधील वैज्ञानिक संशोधनाची संस्कृती व शिक्षण: आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन व समकालीन संधी' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. प्रा. अझुमा म्हणाले, 'भारतीय विद्यार्थी अत्यंत कष्टाळू, प्रचंड स्पर्धात्मक आणि लक्ष्यकेंद्री आहेत. त्यांची गणितीय आकलनाची क्षमता हा महत्त्वाचा गुणविशेष आहे. विद्यार्थिनींचे विज्ञान शिक्षण व संशोधनातील प्रमाण लक्षणीय आहे. भारतात शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयीकरणाच्या बाबतीत मात्र काहीशी पीछेहाट दिसून येते.' समन्वयक डॉ. एस. बी. सादळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. कविता ओझा यांनी आभार मानले.



पुढारी

# उमाजीराजे नाईक यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

आद्यक्रांतिवीर उमाजीराजे नाईक यांना जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात आदरांजली वाहण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या प्रमुख डॉ. ज्योती जाधव, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, जैवतंत्रज्ञान विभागाचे डॉ. व्ही. ए. बापट उपस्थित होते.

पुढारी

# क्रीडा क्षेत्रामध्ये करिअरच्या अनेक संधी : कुलगुरू शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

क्रीडा क्षेत्रामध्ये करिअरच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. या संधीचा लाभ घ्यावा. खेळाडूंनी विविध खेळांमध्ये निपूण व्हावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. एन. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत नव्याने प्रारंभ करण्यात आलेल्या बी.ए. स्पोर्टस् या पदवी अभ्यासक्रमाच्या उद्‌घाटन कार्यक्रमप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, खेळाडू, प्रशिक्षक, संघटक म्हणून मर्यादित न राहता या पलीकडे जाऊन स्पोर्ट सायकॉलॉजिस्ट, स्पोर्टस् जर्नालिझम, स्पोर्टस् फिजिओथेरपिस्ट, स्पोर्ट मॅनेजमेंट, स्पोर्ट अॅडमिनिस्ट्रेटर, जिम इंस्ट्रक्टर व अॅथलिट मॅनेजर यांसह अनेक संधी क्रीडा क्षेत्रामध्ये उपलब्ध आहेत. क्रीडा क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त महिला खेळाडूंनी सहभाग नोंदवून देशाचे नाव उज्ज्वल करावे. संलग्नित महाविद्यालयांनी तालुका पातळीवर हा अभ्यासक्रम राबविल्यास त्यांना निश्चित प्रोत्साहन मिळेल.

क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील, सुचय खोपडे, प्रशिक्षक सुभाष पवार यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठाचा योगाभ्यास... युवा, ज्येष्ठांना आरोग्याचा ध्यास

## ‘आजीवन अध्ययन’च्या अभ्यासक्रमाला वाढता प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आरोग्याबरोबरच मनाची एकाग्रता वाढविणाऱ्या योगाबाबत केंद्रीय स्तरावरून जनजागृती होत असताना शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या विविध योगाभ्यासक्रमाने युवकांबरोबरच ज्येष्ठांनाही भुरळ घातली आहे. विशेष म्हणजे या अभ्यासक्रमातून आरोग्यच नव्हे तर व्यावसायिक स्वरूपातून अनेकांनी रोजीरोटीचे साधन शोधले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने जवळपास ६२ अभ्यासक्रम शिकवले जातात. यात कौशल्याधारित अभ्यासक्रमांवर अधिक भर देण्यात आला आहे. या विभागाच्या वतीने योग सर्टिफिकेट व योग शिक्षक हे अभ्यासक्रम शिकवले जात होते. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. विशेष म्हणजे २४ वर्षांच्या तरुणापासून ते ७५ वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंतचे विद्यार्थी या अभ्यासक्रमाला प्रवेशित झाले आहेत.



शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या योग अभ्यासक्रमात प्रात्यक्षिकांवर भर देण्यात येतो.

### एम. ए. योगशास्त्रकडे ओढा

नव्याने सुरू करण्यात आलेल्या एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाला पहिल्याच वर्षी २६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. कोणत्याही शाखेचा पदवीधर याला प्रवेश घेऊ शकतो. सकाळी ८ ते दुपारी १२ या काळात याचे वर्ग चालतात. योग शिक्षक अभ्यासक्रमाला आतापर्यंत ४८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. प्रत्येक शनिवार-रविवारी याचे वर्ग घेतले जातात.

### असा आहे अभ्यासक्रम

| अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|
| योग सर्टिफिकेट | ६ महिने |
| योग शिक्षक | ९ महिने |
| एम. ए. योगशास्त्र | दोन वर्षे |

सध्या योगाकडे वाढता कल आहे. अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

\- डॉ. रामचंद्र पवार, संचालक, आजीवन अध्ययन, विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ.

माझे वय ७६ आहे. मात्र, योग अभ्यासक्रमामुळे आरोग्याबरोबर या विषयाचा सखोल अभ्यास करता येईल या दृष्टिकोनातून मी प्रवेश घेतला आहे.

\- रामचंद्र पाटील, (विद्यार्थी, सुपात्रे, ता. शाहूवाडी)

- 8 SEP 2023
जनसंपर्क कक्ष
तरुण भारत ...... विद्यापीठ, कोल्हापूर

# बचत गटांना मिळाली विद्यापीठाची साथ...

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ परिसरातील पाच कँटीनपैकी एक कँटीन 'ना नफा ना तोटा" तत्वावर महिला बचत गटाला दिले आहे. त्याच धर्तीवर विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ असो कि इट राईट मिलेट मेला अशा कार्यक्रमांत महिला बचत गटांना स्टॉल लावण्यास विद्यापीठाने परवानगी दिली आहे. प्रशासनाने महिला सक्षमीकरणासाठी बचत गटांच्या प्रगतीला मदतीचा हात देत साथ दिली आहे. दरवर्षी एक इट राईट मिलेट मेला सारखे कार्यक्रम घेऊन महिलांना रोजगार संधी देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

विद्यापीठातील फूड सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी विभागात फुड प्रोसेसिंगचे तांत्रिक ज्ञान दिले जाते. एखाद्या विद्यार्थ्याच्या पदार्थ किंवा शितपेयाला 'स्टार्टअप"तून मार्केटही मिळवून दिले जाते. याच धर्तीवर



- दीक्षांत, इट राईट मिलेट मेलात बचत गटांचे स्टॉल
- महिला सक्षमीकरणासाठी रोजगाराची नवीन संधी
- दरवर्षी एक इट राईट मिलेट मेला घेण्याचा मानस

ग्रामीण महिला नाचणीचे घावण, थालीपीठ, तांदळाचे मोदक, वडा-कोंबडा, नाचणीचे पापड, आंबिल, पिठलं-भाकरी, पुरण-पोळी आदी चविष्ट पदार्थ तयार करतात. त्यांचे दरही बाजारभावापेक्षा कमी असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना कमी पैशात हे पौष्टिक पदार्थ खायला मिळतात अन् बचत गटांना आर्थिक फायदा होतो.

फूड सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान वापरून बनवलेल्या बोराचे लोणचे, चॉकलेट, बिस्कीटस्, लस्सी, ज्युस, नाचणी ओटस् आदी खाद्यपदार्थ कसे बनवले जातात, याचेही प्रशिक्षण महिलांना अशा कार्यक्रमातून मिळते. त्यामुळे प्रशासन यातील काही विद्यार्थ्यांसह महिलांनाही स्टार्टअपद्वारे व्यवसायासाठी मदत करत आहे.

### महिला सक्षमीकरणाला प्राधान्य

नवीन शैक्षणिक कायद्यात महिला सक्षमीकरणाला महत्व दिले आहे. परंतु शिवाजी विद्यापीठ अनेक वर्षापासून उद्योगासाठी महिलांना प्रोत्साहन देत आहे. विद्यापीठातील एक कँटीन बचत गटांना दिले आहे. तसेच शक्य त्या कार्यक्रमात स्टॉलसाठी बचत गटांना संधी दिली जात आहे. महिला सक्षमीकरणासाठी विद्यापीठ खारीचा वाटा उचलत आहेच, पण महिला मेळावे, महिला सरपंचांची कार्यशाळा घेऊन व्यवसायाविषयी मार्गदर्शनही करत आहे.

### बचत गटांचे खास पदार्थ

नाचणीची घावण, तांदळाची मिटुकली, फणसाची भाजी, अळूची वडी, नारळ-भात, थालीपीठ, पापड, खोबऱ्याची चटणी, आंबिल आदी खाद्यपदार्थ बचत गटांच्या स्टॉलवर होते. या पदार्थांना मोठी मागणी असल्याने बचत गटांना हजारो रूपयांचा फायदा झाला. प्रशासनाने विनाशुल्क बचत गटांना स्टॉल दिल्यामुळे समाधान व्यक्त करण्यात आले.

### विद्यार्थ्यांनी दिली महिलांना माहिती

फूड सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी भरड धान्यापासून खाकरा, चॉकलेट केक, मोदक बनवले. इट राईट मिलेट मेलामध्ये या खाद्यपदार्थांची विक्री केलीच. पण बचत गटाच्या महिलांना तांत्रिक पध्दतीने खाद्यपदार्थांची निर्मिती, विक्री आणि बाजारपेठ कशी उपलब्ध करायची, याबद्दल माहिती मिळाली.

डॉ. इराण्णा उडचान (फूड सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी)

सकाळ

# 'जर्नल ऑफ केमिकल इंजिनिअरिंग'च्या सदस्यपदी प्रा. राहुल माने यांची निवड



प्रा. डॉ. राहुल माने

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. राहुल माने यांची ईल्सवेअर पब्लिशिंग ग्रुपच्या साउथ आफ्रिकन जर्नल ऑफ केमिकल इंजिनिअरिंगच्या संपादकीय मंडळाच्या सदस्यपदी निवड झाली आहे. महाराष्ट्रातून निवड झालेले ते एकमेव प्राध्यापक आहेत. प्रा. माने हे औद्योगिक रसायनशास्त्र विभागात गेल्या १४ वर्षांपासून सहाय्यक प्राध्यापक आहेत. आत्तापर्यंत त्यांचे सुमारे ८५ शोधनिबंध आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. सौरउर्जेवर ते संशोधन करत आहे. याविषयावर त्यांची सात पुस्तके प्रकाशित झाली आहेत. सुमारे ३० जर्नलचे परीक्षक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. त्यांना डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीने यंग सायंटिस्ट पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारचे दोन संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. दरम्यान, 'जर्नल ऑफ केमिकल इंजिनिअरिंग'च्या या संपादकीय मंडळावर भारतातील तीन तज्ज्ञ सदस्यांची निवड झाली आहे. त्यातील दोघे आयआयटीमधील तज्ज्ञ आहेत.

लोकमत

# 'बार्टी'चे प्रशिक्षण केंद्र आता शिवाजी विद्यापीठात

## पूर्वप्रशिक्षणासाठी १० सप्टेंबरपर्यंत करा अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांचे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठाला मंजूर झाले.

अनुसूचित जातीच्या उमेदवारांकडून बँक, रेल्वे, एल.आय.सी. व विविध स्पर्धा परीक्षांच्या नि:शुल्क पूर्वप्रशिक्षणासाठी १० सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज मागविले आहेत. त्यासाठी 'बार्टी'च्या संकेतस्थळावर अर्ज भरणे अनिवार्य आहे. याबाबत प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाणार आहे. प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिने असून, याबाबतची सविस्तर माहिती जाहिरातीमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या, तसेच 'बार्टी'च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. शिवाजी विद्यापीठ व बार्टी, पुणे यांच्यामध्ये स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र चालविण्याबाबत करार झाला असून त्यानुसार हे केंद्र मंजूर झाले आहे. कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे यांच्या सहकार्याने ही कार्यवाही पूर्ण झाली आहे.

> अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठात ही संधी उपलब्ध करून देता आली, याचा आनंद आहे.
>
> - **डॉ. श्रीकृष्ण महाजन**, संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठास 'बार्टी'चे प्रशिक्षण केंद्र मंजूर

## ऑनलाईन अर्जाची १० सप्टेंबरपर्यंत मुदत; दोन्ही संस्थेत सामंजस्य करार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांचे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठाला मंजूर झाले आहे.

अनुसूचित जातीच्या उमेदवारांकडून बँक, रेल्वे, एल.आय.सी., व तत्सम स्पर्धा परीक्षेच्या नि:शुल्क पूर्वप्रशिक्षणासाठी १० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज मागविले आहेत. त्यासाठी बार्टीच्या संकेतस्थळावर अर्ज भरणे आवश्यक आहे. प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाणार आहे. प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिने आहे. याची शिवाजी विद्यापीठ व बार्टीच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे.

शिवाजी विद्यापीठ व बार्टी, पुणे यांच्यामध्ये स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र चालविण्याबाबत सामंजस्य करार झाला असून, त्यानुसार हे केंद्र मंजूर झाले आहे.



शिवाजी विद्यापीठातून

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या सहकार्याने ही कार्यवाही पूर्ण झाली आहे.

अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर विद्यार्थ्यांना विद्यापीठास ही संधी मिळाली आहे, आनंद आहे, अशी भावना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी व्यक्त केली.

सकाळ

# 'बार्टी'चे प्रशिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठात मंजूर

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (बार्टी) स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठाला मंजूर झाले आहे.

अनुसूचित जातीच्या उमेदवारांना बँक (आयबीपीएस), रेल्वे, एलआयसी व तत्सम् स्पर्धा परीक्षेच्या निशुल्क पूर्वप्रशिक्षणासाठी १० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज मागविले आहेत. त्यासाठी बार्टीच्या संकेतस्थळावर अर्ज भरणे अनिवार्य आहे. प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाणार आहे.

प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिने असून, याबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या तसेच 'बार्टी'च्या संकेतस्थळावर आहे. विद्यापीठ आणि 'बार्टी'मध्ये स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र चालविण्याबाबत सामंजस्य करार झाला आहे. याअंतर्गत हे केंद्र मंजूर झाले आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या सहकार्याने ही कार्यवाही पूर्ण झाली.

अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर विद्यार्थ्यांना विद्यापीठात ही संधी देता आल्याचा आनंद आहे, अशी प्रतिक्रिया डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी व्यक्त केली.

तरुण भारत

# विद्यापीठाला 'बार्टी'चे प्रशिक्षण केंद्र मंजूर

- ऑनलाईन अर्ज भरण्यास १० सप्टेंबरपर्यंत मुदत
- विद्यापीठाच्या व बार्टीच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध

**कोल्हापूर :** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांचे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र शिवाजी विद्यापीठाला मंजूर झाले आहे. अनुसूचित जातीच्या उमेदवारांनी बँक (IBPS), रेल्वे, एलआयसी, व तत्सम स्पर्धा परीक्षेच्या निःशुल्क पूर्वप्रशिक्षणासाठी १० सप्टेंबर २०२३ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरावयाचे आहेत. त्यासाठी बार्टीच्या संकेतस्थळावर अर्ज भरणे अनिवार्य आहे. याबाबत प्रवेशासाठी चाळणी परीक्षा घेतली जाणार आहे. प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांचा आहे. सविस्तर माहिती विद्यापीठाच्या व बार्टीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

शिवाजी विद्यापीठ व बार्टी, पुणे यांच्यामध्ये स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र चालविण्याबाबत सामंजस्य करार झाला आहे. त्यानुसार हे केंद्र मंजूर झाले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या सहकार्याने ही कार्यवाही पूर्ण केली आहे. अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर विद्यार्थ्यांना विद्यापीठात ही संधी उपलब्ध झाली आहे, अशी भावना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी व्यक्त केली.

पुढारी

# उन्हाळी सत्र परीक्षेला १,३७० विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत गुरुवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. परीक्षेला १,३७० विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा व्यवस्थितपणे सुरू आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षेचे पावित्र्य जपावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.